# प्रकरण चौथे

## रघुवीर सामंतांच्या

## व्यक्तिचित्रांचे स्वरूप

## आणि

## वेगळेपण

## -: प्रकरण चौथे :-

### "कुमार" रघुवीर सामंतांच्या व्यक्तिचित्रांचे स्वरूप आणि वेगळेपण.

आतापर्यंत मराठीत अनेक लेखकांनी व्यक्तिचित्रे लिहिली. ती कोणत्या स्वरूपाची होती त्याचा धावता आढावा आपण घेतला. रघुवीर सामंतांच्या "हृदय", "माणसलेवाईक प्राणी पहिले सात", माणसलेवाईक प्राणी दुसरे सात" व "तारांगण" इत्यादी पुस्तकातील व्यक्तिचित्रे वैविध्यपूर्ण असून दीर्घकाळ स्मरणात राहतील अशीच आहेत.

त्यांच्या "हृदय" या पुस्तकातील शब्दचित्रांचे, कथांचे वर्गीकरणे पुढील प्रमाणे करता येईल. कोळी सुभान्या, मैना माळीण, गंगी पाटीवाली, भागू कोळीण, लडकी भंगीण, धाकू कामगार, अंध भिकारी म्हाद्या, चिनी कापडविक्या, तुळशीदास ट्रामवाला, याकुब व्हिक्टोरियावाला, म्हमद्या फुगेवाला, शेतकरी जीवन, बेरड सोम्या, कारकून केशव मामा, बॅ. मानकामे इत्यादी व्यक्तिचित्रा बरोबरच "पंकस्य प्रक्षालनम्", "निराळी पहाट", "माईंचा रमेश," "तोच इतिहास", "सूड", "डायरीचा उपयोग", "हरवलेले तारे", "गोष्टीची गोष्ट" आणि "हृदय" ही शब्दचित्रे लहान लहान कथा आहेत. तर "जन्म" "मृत्यु" या शब्दचित्रातून सामंतांचे चिंतन प्रकट झाले आहे.

सामंतांनी ही शब्दचित्रे विविध स्तरांतून, विविध जाती वर्गातून निवडलेली आहेत. हे त्यांच्या व्यक्तिचित्रांचे वैशिष्टय मानावे लागेल. त्यांच्या निरीक्षणाचा आवाका किती मोठा आहे याचा प्रत्यय यावरून येतो.

वरील चित्रांत नागर, ग्रामीण, दलित, अस्पृश्य, कामगार, उपेक्षित आणि परिस्थिती ग्रस्त स्त्रिया अशा विविध लोकांची शब्दचित्रे त्यांनी समर्थपणे उभी केलेली आहेत. सामंत हे मुंबईवासीय होते. त्यांच्या अनेक उद्योगा-मुळे त्यांचा लोकसंपर्क अधिक होता. तसेच सूक्ष्म निरीक्षणशक्ती बरोबरच समाजातील विविध स्तरांच्या लोकांकडे पाहण्याचा त्यांचा जिव्हाळ्याचा आणि एकात्मतेचा दृष्टीकोन होता. मुंबई सारख्या शहरातील तुळशीदास ट्रायवाला. याकुब व्हिक्टोरियावाला, अंध भिकारी म्हाद्या, लडकी भंगीण, भागू कोळीण, डॅ. मानकामे या नागर जीवनातील तळागाळात राहणा-या तसेच उच्च जीवन जगणा-या व्यक्तींच्या शब्दचित्रांची घडण रेखीव पध्दतीने केलेली आहे. तसेच ग्राम जीवनाकडे ही पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन कमालीचा कळवळ्याचा दिसतो. शेती करणारा "जीवन", मासेमारी करणारा "सुभान्या", बेरड "सोम्या", "आप्पांची बैलाची जोडी" यावरून शेतकरी आणि श्रमजीवी यांचे जीवन त्यांनी प्रथम शब्दचित्राद्वारे साहित्यात प्रविष्ठ केले. हे ही त्यांचे कार्य लक्षणीय म्हणावे लागते. तसेच "भागू कोळीण" "धाकूकामगार" "मैना माळीण", "म्हमधा फुगेवाला," " गंगी पाटीवाली" अशा उपेक्षित व्यवसाय करणा-या लोकांचे जीवन ही रघुवीर सामंतांच्या वाङ्:मयीन दृष्टीतून सुटले नाही इतकी त्यांची व्यापक दृष्टी जाणवते.

<u>व्यक्तिचित्र रंगविण्याची हातोटी</u> :

रघुवीर सामंतांनी व्यक्तिचित्रांचे दर्शन करून देताना सूक्ष्म अवलोकन,

त्या व्यक्तीच्या बाहयांग आणि अंतरंगाचा घेतलेला शोध, वर्ण्य विषयाशी एकरूपता आणि अलिप्तता, मार्मिक शब्दयोजना आणि तटस्थता या गुणांचा परिपोष ही व्यक्तिचित्रे वाचल्यानंतर जाणवतो. उदा. "आप्पांची बैलाची जोडी" या कथेत आप्पा वारल्यानंतर मुक असणारे बैल अन्नपाणी सोडतात. ही घटना सुध्दा मनाला चटका लावून जाते. "संधिप्रकाशा" तील व्यक्ति चित्राची सुरुवात "हंबीर मरावयास टेकला होता" किंवा "पाटीवाली" या शब्दचित्राचा प्रारंभ "गंगेच्या आज पाटी घेऊन बाजारात जाणे जिवांवर आले होते" तर "भूक " या व्यक्तिचित्राची सुरुवात " भूक व मनुष्यत्व यांचा फार निकटचा संबंध असतो विषम जगांत ती जास्त जाणवते आणि मनुष्याला तीच अमानुष करते " अशा वाक्यांनी सुरुवात करून कथेत चित्रीत झालेले त्या व्यक्तीचे सुख दु:ख आणि मनात उठलेल्या प्रेरणा चटकन वाचकापर्यंत पोहोचतात. कमी शब्दात अर्थघनता आणणे हे समर्थ लोकांचे लक्षण असते. त्यांच्या निरीक्षण शक्तीची समृध्दता दृगोचर होते.

"धाकूचे आयुष्य" मधील रत्नागरी जवळचे खेडे सोडून पोटासाठी मुंबईच्या गिरणीची वाट धरलेला धाकू कामगार लोकांच्या सांगण्यावरून आपली अर्धी कच्ची मीठ भाकर सुधारेल या आशेने संपात सामील होतो. पगार बंद होतो. अन्नान दशा होते. उपासमारीने कायको,पोर मरते, संप मोडल्याची बातमी कळाल्यानंतर विमनस्क अवस्थेत धाकू पुन्हा गिरणीच्या वाटेला लागतो या शब्दचित्राचा शेवट करताना सामंताचे भाष्य असे आहे " तिसऱ्या दिवशी गिरणी चालू झाल्या तेंव्हा सर्व झुंडी बरोबर धाकू ही पुन्हा गिरणीत कामासाठी शिरला । "

श्रीमंता घरी मोलकरणीचे काम करणारी मैना माळीण. तिला पहिल्या लग्नाची दोन, तीन मुले लाभलेली नाहीत. कर्ता सवरता घरधनी निघून गेल्यावर ती उघडी पडते. मूल व्हावे अशी इच्छा असणारी मैना याळीशी उलटलेल्या माळ्या बरोबर पाटार्च लग्न करून माळीण होते. कालांतराने तिला दिवस जाता. मोठ्या आशेने ती मुलासाठी इवली टोपडी शिवते. पण ते मूल ही तिला लाभत नाही. पुन्हा वाट्याला आलेलं एकाकी आयुष्य आणि पोटाची चिंता घेऊन ती कामाला लागते. मृत मुलाच्या स्मृतीने सुन्न अवस्थेत त्या "मैना माळीणी"च्या अंत:करणाचा ठाव घेताना रघुवीर सामंत या शब्दचित्राचा शेवट असे करतात, "झबल्याचे बोचके उघडून ती पुन्हा पुन्हा एक एक उलगडून पहात होती ! मुद्दाम मशीनवर शिवून घेतलेली झबली तिच्या हातून गळून पडली ! आणि त्याच वेळी डोळयातून अश्रू गळाले !"

सर्व गावाची घाण आपल्या डोईवरून वाहणारी "लडकी भंगीण " श्रीमंताच्या घरी लग्नाच्या प्रसंगी जेवणाच्या आशेने पंक्तीच्या सुरुवातीला गेल्यानंतर, "लवकर आलीस, पंक्ती पडल्यानंतर" अजून पाहुण्यांची जेवणे व्हायची आहेत नंतर ये " ! आणि पंक्ती संपल्यानंतर जेव्हा भंगीण पुन्हा जाते तेव्हा आता अन्न संपलेले आहे, शिल्लक नाही म्हणून तिला हाकलून देतात. आपल्या पोटासाठी मैला वाहणाऱ्या भंगीणीच्या मनात भूकेची केवढी आग उठली असेल याची कल्पनाच करता येत नाही.

मासळी विकणारी भागू संसारात कर्तव्यदक्ष असणारी गृहिणी आहे.

नव-याच्या खांद्याला खांदा लावून संसाराचा गाडा ओढते आहे. दुस-याला कालिका मूर्ती वाटणारी भागू नव-याने आणलेल्या माशांची विक्री करून स्वाभीमानाने जगते.

चीन देशातून भारतात आलेला कापडविक्या आपले पोट भरण्यासाठी पाठीवर कापडाचे ओझे घेऊन रस्तोरस्ती आणि दारोदार भटकून कापड विकून उपजिविका करतो. त्याला कोणी काही बोलते सौदा पटला नाही तरी त्याच्यावर न रागावता पुढच्या दारी निघून जातो. दैनंदिन याच कामामुळे शिणलेल्या शरीराला आणि मनाला आपल्या देशातील माणसाशी बोलून ताजातवाना होत असे. पुन्हा आपल्या कामाला जात असे. बाहेरच्या देशातून येऊन इथे आपल्या जीवीताची वाटचाल करणा-या "चिनी कापड-विक्यांचे" चित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे.

दुष्काळामुळे भुकेने व्याकुळ झालेल्या मुला बाळांचे दैन्य न पाहवणारा मोम्या बेरड चोरी करतो त्याला पकडून तुरुंगात घालतात. तुरुंगात त्याला खावयास भरपूर मिळत होते. शिक्षा संपल्यानंतर तो पुन्हा गावी येतो. पुन्हा त्याला भुकेचा प्रश्न भेडसावतो आणि त्याच तिरीमिरीत खून करून पुन्हा तुरुंगात जातो. बेरड समाजाची बेडर वृत्ती दाखविण्यासाठी आणि भुकेची तीव्रता माणसाचा विवेक नाहीसा करते हे "भूक" या शब्दचित्रातील सूचन आहे.

सावकाराचे घरी घरकाम करणारा अशिक्षित जीवन सावकाराघरी सर्व प्रकारचे काम कारणारा हरकाम्या घरगडी आहे. आहे त्याच परिस्थितीत

आनंद मानण्याची वृत्ती मुंबईचे जीवन पाहण्यापेक्षा गावाच्या याचेत फिरण्यात त्याला आनंद. घरकाम करताना सावकाराच्या घरातील दहा रुपयाच्या सात नोटा व काही सुटी नाणी मिळाल्या असता सुध्दा ते पैसे शेठानीकडे परत नेऊन देतो. अशा निर्वाज्य, निष्पाप आणि प्रामाणिक घरगड्याचे "जीवन" चे चित्र स्मरणात राहणारे आहे.

सामंतांनी कोळी समाजातील "सुभान्या" च्या व्यक्तिचित्राद्वारे उपेक्षित, पीडित, दैन्य दारिद्र्याने पिचलेल्या आणि ज्यांचे पोट हातावर आहे अशा कोळी समाजाचे प्रातिनिधिक चित्रण "सुभान्यात" मांडले आहे. सकाळी लवकर उठून जावे, मडकी व होडी घेऊन समुद्रात जाणे. सायंकाळ पर्यंत मासे पकडणे, संध्याकाळी झोपडीकडे परतणे, आणि मुलाबाळात भाकर-कोरड्यास खाऊन आनंदात राहणे, समाजात बरेच लोक पैशासाठी शरीर यातना करून घेतात. परंतु एका वेळेची भूक भागविण्यासाठी दिवसभर कष्ट घेणारा सुभान्या हा पैसेवाल्यापेक्षा अधिक सुखी वाटतो. नगण्य समजल्या जाणाऱ्या मासे विक्रेत्या सारख्या व्यक्तीकडे आणि त्या समाजाकडे दृष्टीक्षेप टाकणे वैशिष्ठ्यपूर्ण आहे.

मरणाच्या दारात उभा राहिलेला एकाकी "हंबीर" घोडा तरूणाईत त्याच्या धन्याने त्याची अपूर्वाई केली. आता सर्वांना त्याचे विस्मरण झालेले. अखेरच्या काळात कोणी यावे. एखादा प्रेमळ शब्द बोलावे आणि मायेची थाप पाठीवर पडावी, मग आनंदाने प्राण सोडावा अशी आशा बाळगणारा हंबीर धन्याच्या घराभोवती प्रदक्षिणा घालतो आणि प्राण सोडतो तेंव्हा हंबीरचा जुना सवंगडी असणारा शिकारी कुत्रा मोत्या मात्र मोठ मोठ्याने हेल काढून

रडत राहतो. "संधिप्रकाश" या शब्दचित्रातील प्राणी मात्रांचे आप आपसातील स्नेहसंबंधाचे चित्रण विशेष लक्षणीय वाटते.

सुमतीच्या लग्नाचे तीन हजाराच्या हुंड्याच्या रक्कमेसाठी कोठे जमत नाही म्हणून "हृदय" मधील शिवरामभाऊ तीन हजाराची लाच स्वीकारून सुमतीचे लग्न पार पाडतात आणि प्रकरण उघडकीस येताच कबूली जबाब लिहून देऊन गजाआड जातात. घारीचे घरटे आणि शिवरामभाऊंचे कुटूंब यांची सुरेख तुलना सामंतांनी केली आहे. शिवरामभाऊ, अनुसूयाबाई आणि छोटा गोपाळ यांच्या व्यक्तिरेखांना कारुण्याची झालर आहे.

सामंतांनी आपल्या शब्दचित्र लेखनातून साकार केलेली माणसे जवळून पाहिली होती. "उच्चभ्रू स्त्री पुरुषांपासून तळागाळातल्या दरिद्री, दलित, ग्रामीण व्यक्ती पर्यंतच्या सर्वांचा व्यापक पट सामंतांनी निर्माण केला. "त्यामध्ये "लखपती" होण्यासाठी धडपडणारे बॅ. मानकामे. साध्या सरळ स्वभावाचे संसारी "केशवमामा""तोच इतिहास" मधील प्रवाह पतीत कालिंदी सासरच्या जाचहाटाला कंटाळून आत्महत्या करणारी "तारा" या मध्यम-वर्गीया प्रमाणेच कोळी, बेरड, भिकारी, फुगेवाला, कापडविक्या, ट्रामवाला, कामगार, व्हिक्टोरियावाला, भंगीण, कोळीण, पाटीवाली, मोलकरीण माळीण" ही नांवे देखिल त्यांच्या व्यक्तिचित्रातील विविधता स्पष्ट करतात.

सामंतांची स्वत:च्या लेखना बद्दलची प्रतिक्रिया नमूद करावीशी वाटते. प्रगती साप्ताहिकात "भंगीण" हे शब्दचित्र प्रसिध्द झाले. तेव्हा उच्चभ्रू लोकांनी असा विषय साहित्यक्षेत्रात मांडण्याबद्दल नाके मुरडली होती.

तथापी "कोळीण" हे शब्दचित्र प्रसिध्द झाल्यानंतर दलिताबद्दल सहानुभूती दाखविणा-या सामंतांबद्दल ही सहानुभूती दाखविण्यात आली. त्या संदर्भात सामंत म्हणतात "सहानुभूतीची रसिक मनातील निर्मिती व नव्या दृष्टीकोनाला दिली जाणारी अप्रत्यक्ष कलाटणी या गोष्टी लेखकाच्या खासच हाती असतात व त्याचा ही समाजाला उपयोग होत असतो." [२]

सामंतांनी व्यक्त केलेल्या भूमिकेशी रसिकांनी प्रतिसाद दिला आणि सामंतांची लेखनाची भूमिका काय होती या संबंधीचे ज्ञान झाले. सामंत आपले व्यक्तिचित्र उभा करताना मनात असलेल्या कथा बीजाला ते दृष्य वस्तुच्या निरीक्षणाने त्या शब्दचित्राला आकार देतात. "आप्पांची बैलाची जोडी" या शब्दचित्राचे रेखाटन कसे झाले. या विषयी सामंत लिहितात. "आप्पांची बैलाची जोडी काल्पनिक असली तरी आप्पा मात्र प्रत्यक्ष जीवनात दिसलेल्या दोन तीन करारी वृध्दांच्या अनुभवांच्या मिश्रणातून समूर्त झाले आहेत ... हे शब्दचित्र पुढे फार नावाजले, पुष्कळांना आवडले" [3]

"सामंतांच्या शब्दचित्र रेखाटनात शब्दांच्या साहयाने "चित्रण " उभे करण्याची शक्ती आहे" [४] याचे प्रत्यंतर त्यांची शब्दचित्रे वाचताना होते. उदाहरणार्थ जीवनचे व्यक्तिचित्र रेखाटनाता " त्याच्या वारली जातीच्या सर्व साधारण लोकांपेक्षा जीवन अशक्तच, डोकी केलेलं तुळतुळीत डोकं. चपटसं नाक, त्यातून मिशाशी सख्य करावयास बाहेर येणारे केस, लहानशा मिशया,

पिवळे व थोडेसे पुढे आलेले दात ... नेहमी हसतमुख असल्यामुळे, ते जास्तच ठळकपणे दिसत".

लडकी भंगीणीचे चित्र रंगविताना सामंतांनी लिहिले आहे. "डोक्यावर माखलेला डबा, हातात वापरून झिजलेला खराटा । - दुस-या हाताने छुडीत काठ धरून ती डबा सावरीत होती. तिचे एकंदर कपडे मलीनच । लांब रूंद घेराचा मळकट घागरा आवरून वर घेतलेला, वर पिवळा-तांबडा अशा काहीशा रंगाच्या कापडाचा तुकडा कंबरेजवळ अडकवून नंतर वर घेऊन तिने त्याचा पदरा सारखा उपयोग केला होता । घाग-याच्या एका बाजूस मळकासा रूमाल खोचला होता".

म्हमद्या फुगेवाला पुढील वर्णनाने सामंतांनी आपल्या पुढेच उभा केला आहे असे वाटते "त्याच्या पोषाख साधा मळकटच । तांबडया रंगाचा पायघोळ पडका, एक फाटका सदरा, त्यावर एक काळं जाकीट, खांद्यात जाकिटाचा मुंडा, यात हात अडकवलेला, भडक रंगाचा पण फाटकासा रूमाल, डोक्याला एक फेट्यावजा गुंडाळलेलं मळकं पट्टयांचं रंगीत "लुगडं" फारसा म्हातारा नव्हता तो । त्याच्या मोठाल्या मिशया अजून काही पिकलेल्या नव्हत्या. तोंड रूंद, नाक मोठं; भिवया वाढलेल्या, मिशयांचे कल्ले वर चढलेले । यामुळे त्याच्या चेह-यात थोडी उग्रता आली होती ".

"कुमार रघुवीर यांच्या शब्दचित्रात सूक्ष्मता अधिक आहे.[५] याची प्रचिती येते. सामंत आपल्या निरीक्षण कौशल्याने सूक्ष्म तपशिला बरोबरच वर्ज्य व्यक्तीच्या चालचालीतील बारकावे टिपून घेतात. आणि त्यात

आपोआपच गतीमानता आणि नादमयता निर्माण होते आणि व्यक्तिचित्राचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. "सुभान्या" चे चित्र त्या दृष्टीने आकर्षक दिसते. उदा. "आपल्या मळकट कुडत्याच्या आतल्या खिशातून त्याने तंबाखूची पुडी काढली. खिशातील आपटयाची दोन पानं काढून ती त्याने आपल्या जिभेवर फिरवून ओली केली. ती एकावर एक ठेवून थोडी पुढंमागं सरकवली, नि त्याच पुडीतील "तमाख" घालून त्याने "बाकली" वळवली. उजव्या खिशातील "चकमकी" ने ती पेटवून दोन चार झुरके घेतल्यावर त्याच्या दमल्या भागल्या जीवाचं पूर्ण समाधान झालं! त्याला नवा जोम आला! आणि नविन जाळं टाकण्यासाठी त्याने अथांग सागरावरली आपली महानगी होडी आणखी आत ढकलली..."

व्हिक्टोरिया चालवून आपले पोट भरणारा "याकूब" उभा करताना सामंत लिहितात. "चल!...चल बेटा!" हातातील लगाम घोडयाच्या पाठीवर हलकेच आपटत याकूब म्हणाला. घोडयाला तेवढा इशारा नेहमीचा सवयीमुळे पुरेसा होता. तो हळूहळू दुडक्या चालीने धावत निघाला. गरगर फिरणाऱ्या चाकांचा अस्पष्ट आवाज ठेक्यात पडणाऱ्या घोडयांच्या पावलांच्या आवाजात ऐकू येत नव्हता. मधून मधून घोडयाचं फुरफुरणं, पुढील फळीवर आपटल्या जाणाऱ्या चाबकाच्या दांडयाचा "खाट् खाट्" आवाज, या शिवाय इतक्या पहाटेस त्या अगदी बाजूच्या गल्लीत दुसरा कसला आवाज येणार?"

सामंताची वर्णन शैली इतकी आखीव आणि रेखीव आहे की थोडया शब्दातच, एका कुंचल्याच्या फटकाऱ्यात चित्रकाराने चित्र साकार करावे

इतक्या कमी शब्दात सामंत शब्दचित्र उभा करतात. "ट्राम ड्रायव्हर" चे शब्दचित्र ते असे रेखाटतात. "एकसो पचीस।... इन्स्पेक्टर च्या तोंडचे शब्द ऐकताच तुळशीदास भराभर पावलं टाकीत आपल्या ट्रॅमकडे धावत आला. येता येता त्याने एका हातातील भेळीची भेळीची पुडी आपल्या खिशात कोंबली व उजव्या हातातील पानपट्टी [ मधलं बोट नि अंगठा यामध्ये धरुन] तोंडात भरीत, अस्पष्ट आवाजात म्हटलं, "हां साब! " अंगाला हिसका देऊन खटर्र ..... करीत त्याने उजव्या हातातील दांडा गरकन फिरवला, ब्रेक सोडले व डाव्या हाताने विजेचा प्रवाह सुरु केला. त्याची गाडी पुन्हा सुरु झाली."

सामंत आपल्या शब्दचित्रात नादमयता, गतीमानता तर आणतातच परंतु कांही वर्णनातून आपल्या अंत:करणाला कांही तरी स्पर्श होतो आहे अशा स्पर्शछटा ही ते व्यक्त करतात. उदा. "समुद्राच्या लाटा येत जात होत्या. आधीच गुडघ्यापर्यंत आलेलं लुगडंसुध्दा मधूनमधून येणा-या मोठया लाटांनी ओलचिंब झालं होतं. जाळं ओढताना चोळीचे हात व लुगडयाचा खांद्यावरील भाग भिजून थबथबत होता. वा-यामुळे मधून मधून त्या मायलेकींना कुडकुडल्या-सारखं वाटे." अशा तीन-चार वाक्यात फटकारा मारुन ते कोळीणीचे चित्र उभ करतात.

रघुवीर सामंतांची शब्दसृष्टी अशी संप्पन्न आहे. निरिक्षणातून अनुभव समृध्दता त्यांच्या ठिकाणी आलेली होती. त्याकाळी असे शब्दचित्र लिहिणे सर्वमान्य झाले नव्हते. तरी आपल्याला भेटलेल्या व्यक्तींची ही चित्रे कॅमेरा

जसा फोटो घेतो तशी त्यांच्या प्रतिभेने आणि निरिक्षण शक्तीने ही शब्दचित्रे टिपल्यासारखी वाटतात. सामंतांनी "हृदय" या पुस्तकात शब्दचित्रांची जी वर्णने केली आहेत. ती केवळ माणसेच नाहीत तर प्राणीसुध्दा त्यांच्या सहानु-भूतीचा विषय झालेले आहेत.

माणूस व माणूस, माणूस व प्राणी, प्राणी व प्राणी यांचे परस्पर संबंध त्यांच्या नजरेतून सुटलेले नाहीत. धाकू कामगार, व्हिक्टोरियावाला, मुंग्याच्या बगात, संधिप्रकाश, आप्पांची बैलजोडी, इत्यादी मधून या संबंधीची वर्णने रेखीवपणे आलेली आहेत. कांही व्यक्तिचित्रात मनातील कारुण्य ओतप्रोत भरलेले आहे. तारा, कालिंदी, अविनाश, माधव, रमेश, आदींच्या चित्रणात कारुण्याचा परिपोष दिसतो. रघुवीर सामंत हे चिंतनशील लेखक असल्यामुळे "जन्म" "मृत्यु" या विषयी ते चिंतनशील मृत्तीने लिहितात.

सामंतांनी आपल्या कांही व्यक्तिचित्रांना लघुकथेच्या वर्णनाची डूब दिलेली आहे. "पंकस्थ प्रक्षालनयू,""निराळी पहाट," "माईंचा रमेश,"" तोच इतिहास," "सूड", "डायरीचा उपयोग", "हरवलेले तारे," "गोष्टीची गोष्ट" यातील वर्णने लघुकथेला जवळची आहेत. सामंतानी आपले लेखन तरुण वयात सुरु केले. स्वभाव चित्रे, चित्रबंध, लघुनिबंध, लघुकथा त्यांनी पुढे लिहिल्या ही... त्या लेखनाची स्फूटबीजे त्यांच्या सुरुवातीच्या शब्दचित्रात आलेली होती.

"हृदय" मधील शब्दचित्रे लिहिल्यानंतर त्या शब्दचित्रांचा प्रवाह स्वभाव चित्रांकडे वळलेला आपणाला दिसतो. सन १९४० साली सामंतानी आपल्या "अमर ज्योती वाड्‌मय प्रकाशना" तर्फे "मासलेवाईक प्राणी पहिले सात" व " मासलेवाहिक प्राणी दुसरे सात" ही स्वभावचित्रांची पुस्तके प्रकाशीत केली. या पुस्तकातील पहिल्या सातमध्ये "शिस्तीचा शिलेदार", "फणसाचे गरे," "कावळे

हेडसर," "स्थितप्रज्ञ," "परमेश्वरी प्रकाश," "बाबूजी", "न्यायदेवता" आदी तर, दुस-या सता मध्ये "एम. एस. एम." " तरणा म्हातारा," "रेडिओ," "मनचंगा," "तो ओ शाळा," "उस्तादजी", "दैन्य" इत्यादी स्वभावचित्रांचा समावेश आहे.

मानवी स्वभावाचे विविध पैलू सामंताच्या "मातलेवाईक प्राणी मधून प्रकट झाले आहेत.

"त्या तेवढया टापूत काकाजी नुसते प्रतिष्ठद नव्हते त्यांचे नांव उच्चारलं की, लहानांपासून थोरांपर्यंत, गरिबांपासून त्यांच्या बरोबरीच्या श्रीमंतापर्यंत सा-यांच्याच अंगाचा अगदी थरकांत होई।" या वाक्यानेच शिल्तीचा शिलदाराविषयी औत्सुक्य निर्माण होते. असे "काकाजी" आहेत तरी कसे ? हे जाणून घेण्यासाठी त्यांची ओळख करून घेण्याची अनावर इच्छा होते. दोन मोजक्याच प्रसंगातून काकाजींच्या स्वभावछटांचे दर्शन सामंतांनी घडविले आहे. काकाजींची प्रत्येक वागणूक एका विशिष्ठ दृष्टीची व अर्थपूर्ण अशी आहे. काकाजींचे बोचक प्रश्न, शिमराळ तोंड, भेदक दृष्टी व हातातील जाडजूड सोटा, या गोष्टी प्रमाणेच त्यांच्याकडे असलेली गडगंज श्रीमंती यांची एकंदर गोळा बेरीज मात्र सामान्यपणे सा-या लोकांच्या मनात वजलेपासारखी राहते असा धाक, दरारा आणि चौकस कुतूहल असणारे काकाजी एखाद्या नवख्या अनाहूतावर जसे "अरे कोण रे ! कुठं चाललास ? गांव कोण तुझं ? या सारख्या पाच पन्नास प्रश्नांचा भडीमार करायचे तसेच मुलांनी खेळताना शांतपणे खेळावं हे त्यांचे प्रांजळ मत असावयाचे. एखादा मुलगा जर काकाजींच्या धाकाने रडकुंडी फिरलाच तर त्याला जवळ घेऊन हापूसचा आंबा द्यायचे तसेच पाणी प्यायला विहिरीवर जाऊ इच्छिणा-या पांथस्थाला पोह-या मिळावा म्हणून किंवा

गुरांना जायला वाट मिळावी म्हणून वामकुक्षी झटकून फाटक ही उघडत असत असे सहृदय ही आहेत.

रहाटकालागणा-या बांडया विकत घेण्याच्या प्रसंगातून काकाजींचा व्यवहारी चोखपणा जाणवतो. दीड आणा जोडी या प्रमाणे दोन कोड बांडी जोडी घेताना काकाजीचा मुलगा बच्चू मात्र कुंभाराला साडे सात रुपये देतो. संतापलेले काकाजी आपल्या मुलाची चारचौघातसमक्ष कान उघाडणी करताना म्हणतात. " तुझ्या बापाने तुला उधळण्यासाठी नाहीत पैसे ठेवलेले निर्लज्ज! लाखाचे बाराहजार करणारा! जा आधी त्या गाडीवाल्याला पकडून आण माझ्या समोर!"

करडया स्वभाव्या काकाजींची प्रत्येक बाबतीत एक ठरलेली शिस्त असे. आणि त्या शिस्तीविरुद्ध कोणीही गेलेले त्यांना खपत नसे. मग तो भले सरकारी अंमलदार का असेना! प्रांत साहेबाच्या भेटीच्या प्रसंगातून पुढयात रक्षापात्र असताना देखिल बिडी ओढून अंगणात भिरकावणा-या प्रांतालाही काकाजी सुनावतात. " आपण मघापासून बिडया खिडकीतून अंगणात भिरकावता आता शिस्त काय माझ्या सारख्यांनी शिकवायची थोडीच या वयात आपल्याला!"

आपल्या जीवनात शिस्तीचे पालन करणारे आणि तितकेच सदस्य असणारे काकाजी अक्षरश: लोटा घेऊनच परप्रांतातून आलेले. इथे स्थिरावले. "देश तसा वेश " याच महात्म त्यांनी ओळखले होते म्हणूनच सामंत लिहितात. "हा अस्सल गुजराथी बनिया आहे. हे कोणालाही सांगितल्यावाचून कधी समजलं नसतं. ती बनियोगिरी मात्र त्यांच्या रक्तातीलच! लहानपणी फटींग असणा-या

काकाजींनी म्हातारपणी संपत्ति, घरदार, गुरंढोरं, नोकर-चाकर हे सर्व आपल्या हिमतीवर मिळवलं होतं. त्याच्या आयुष्याचा खडतर पूर्वार्ध आणि म्हातारपणा-उत्तरार्ध यात जमीन अस्मानाचं अंतर होतं. पण त्यांना अस्मान कधीच ठेंगण वाटत नसे. !

रघुवीर सामंतांनी बाहेरच्या प्रांतातून महाराष्ट्रात व्यापारासाठी आलेल्या या बनियाचे हे चित्र, बनियाच्या स्वभावधर्मा प्रमाणेच चित्रित केले आहे. पैसे मिळविताना अवांतर खर्च न करणे. आपल्या मुलालाही ते पैसे खर्च करू न देणे आणि कष्ट करूनच पैसे मिळविले पाहिजेत. हे व्यापारी गुण सामंतानी चितारले आहेत. विडया ओढून खिडकीतून बाहेर टाकणा-या प्रांत अधिका-या-लासुध्दा विडया बाहेर न टाकण्याविषयी सूचित करतात. यावरून त्यांच्या कडक शिस्तीचा प्रत्यय येतो. समाजातील शिस्तीचा आदर्श ही या व्यक्तिचित्रातून सामंतांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कदाचित सामंतांच्या मनावर आपल्या वडीलांची करडी शिस्त असावी असे वाटते.

एम्. एस. एम्. [मारीच सूर्यराव मोरे] हा सामंतांच्या संपादक मित्राचा घरगडी. सातयत्ता शिकलेला एम्. एस. एम्. या रेल्वेच्या नावाबरोबरच बुध्दी आणि शरीराच्या हालचालीत विलक्षण साम्य असलेला निरीश्वरवादी संपादकाच्या खोलीत रामपंचायतन लावण्याची करामत करणारा मण्या तसा भाबडा आहे. कामा पेक्षाही प्रश्नचिन्हेच त्याच्यापुढे उभी रहातात. आणि बऱ्याच बाबीत तो संपादक धन्याच्या परस्पर निर्णयही घेतो. चित्रकलेचा त्याला छंद आहे. संपादक महाशया-च्या खोलीभर भिंतीवर त्याने स्त्रि, पुरुष, लहानमुले, पशु, पक्षी त्याचबरोबर

हिंस्त्र प्राणी काढून शिकारखाना निर्मिला आहे. ब्रिलियंटाईनच्या बाटल्यांची चित्रे कापून चिकटवलेली, फुटका आरसा, मोडकी फणी, आदिनी अलंकृत केलेली आपली सचित्र जीवन कहाणी ही त्याची कधी ही प्रसिध्द न झालेली पहिली आणि शेवटची साहित्यकृती होती. हरिविजय, संतलिला आदि पुस्तके तो जशी पदरमोड करून खरेदी करतो तसाच संतलिलेत समाज स्वास्थ्य चा अंक ठेऊन देहुरी वाचन करणारा तो छुपा रस्तुम ही आहे. पाच आण्यात व्हिक्टोरिया ठरवून आण म्हटल्यानंतर चार आण्यात जमविण्यासाठी तासभर भटकणारा काटकसरी सुध्दा आहे. संसाराच्या उंबरठ्यावरच पळून गेलेली बायको परिणामी वाट्याला आलेली चिरविधुरावस्था भोगणारा म-या मनाचा अगदी चोर बाजार झाला असला तरी तो प्रामाणिक वृत्तीचा आहे. याचे स्वभावदर्शन सामंतांनी एम्. एस. एम्. मधून घडविले आहे.

सामंतांची माणसे पारखण्याची आणि त्यांच्या स्वभातील बारीक, बारीक वैशिष्टये टिपण्याची क्षमता लक्षणीय आहे. संपादकाकडे कामाला असणारा साधा नोकर परंतु त्याला चित्रकला, वस्तुसंग्रहाचे ज्ञान आहे. तसा काटकसरी सुध्दा आहे. बायको तरूणपणीच निघून गेली तरी प्रपंचा विषयी कटूता किंवा तुच्छता न दाखविता प्राप्त झालेल्या जीवनात आनंदाचे क्षण शोधण्याचा तो धरगडी प्रयत्न करतो. सामंतांची तुटक-तुटक वाक्ये त्याचे चित्र उभा करतात.

फिरतीवर असताना पुण्यातील आपल्या जुन्या मित्राकडे उतरावे या अपेक्षेने निवेदक मित्राच्या बि-हाडी जातो औपचारीक चहापानानंतर तो

13113
A

मित्र बुधवारात दोन रुपयात एक दिवसाची राहण्या जेवण्याची व्यवस्था होत असल्याचे सांगतो. आपल्यासाठी जीव टाकणा-या मित्राने सोबतीची ट्रंक-वळकटी पाहून देखील आपणाला असा सल्ला द्यावा याचे निवेदकाला आश्चर्य वाटते. मात्र दुस-या दिवशी जेवणाचे तो आमंत्रण देतो.

दुस-या दिवशी निवेदकाला पाटावर बसवून पक्वान्न भोजन देऊन जेवणानंतर फणसाच्या काट्या व खोब-याच्या कातळ्या निवेदकापुढे ठेवतो आणि काल आमच्या घरी पाचवी असल्यामुळे बाहेरच्या माणसांना भोजन देता येत नाही. माझ्या घरच्या माणसांच्या सोयी व भावना जपताना मी तुम्हाला खोटा आग्रह केला नाही. तुमच्या समाधाना पेक्षाही माझ्या म्हाता-या आईला समाधान देणे मला योग्य वाटले असा खुलासा करतो. घरगुती अडचणीमुळे जेवायला न बोलावू शकलेल्या मित्राच्या मनात निर्माण झालेली अपराधी भावना चित्रित करताना फणसाचे बाहय काटे आणि अंतर्गत रसाळपणा यांचा सामंतांनी कौशल्यपूर्ण उपयोग केल्याने सामान्य प्रसंगावर आधारलेले हे स्वभावचित्र चांगल्या त-हेने स्मरणात राहते.

ना घरदार, ना मूलबाळ, ना नात्यागोत्याची कोणी माणसे, असे सडेफटिंग बाबूजी बंगालातून महाराष्ट्रात आले आणि महाराष्ट्रीयन झाले. एकाकी असणा-या बाबूजींचा मित्र समुदय फार मोठा आहे. मित्रांचा संसार आपलाच मानून त्यांच्या सुख दु:खाशी तन्मय होणारे बाबूजी आपले

एकाकी जीवन जगताना ही दुस-याला सुखावणारे त्याच्या सुखात आपले सुख शोधाणरे आहेत. शिरपा शिपायाच्या बायकोच्या सेवा सुश्रुषे साठी ते सोनापूरातील कोंदट चाळीत चार दिवस राहिले आहेत. व्यसनी शिरपाला बचतीचा मार्ग दाखवून त्याला मार्गी लावला आहे. ब्रिटीश सरकारने कंपनी ताब्यात घेतल्यानंतर आपल्या नोकरीचा आलेला फंड बक्षिसी जे मिळालं ते घेऊन त्यातील लहान मोठ्या रकमा ऑफिसातील लहान लहान नोक-या गेल्या त्यांना वाटल्या. आणि ते आपल्या मुगभाटातील चिवडा चाळीत परतले. सेवा निवृत्तीनंतर ही आपल्या ऐपती प्रमाणे ते मित्रांच्या सुखद:खात सहभागी होत राहिले. जगाच्या धर्म शाळेत आपण पथारी टाकली होती. आता आपला मुक्काम संपला. सर्वांना सोडून आपणाला गेले पाहिजे. या जाणिवेने अखेरच्या दिवसात मित्रांच्या आग्रहाखातर ही औषधोपचार नाकारतात. तुम्ही गेलात तर आम्हाला फार दु:ख होईल. रडू कोसळेल असे सांगणा-या मित्रांना मेल्यावर सुध्दा मी तुम्हाला हसवेन अशी पैज लावणारे बाबूजी आपल्या मृत्युनंतर ही सर्वांना हसवतात.

जीवना विषयी औत्सुक्य असणारे पण लोभ नसणारे बाबूजी आपल्या एकाकी जीवनात ही तृप्त आणि सुखी आहेत दुस-याच्या सुख दु:खात सहभागी झाल्याने आनंद वाटतो. ही मानवी मूलभूत प्रवृत्ती सामंतांनी ओळखून अशा प्रवृत्तीचे दिग्दर्शन बाबूजी या व्यक्तिचित्रात केले आहे.

प्रथम पाहता क्षणीच हा गृहस्थ कोणी मास्तर असावा असा गैरसमज व्हावा असा पोषाख आणि अविर्भाव असणारा पोवळे शिपाई ।

वर्तमानपत्र विकण्यापासून कंपोझिटर तेथून बाईंडिंगखाते असा प्रवास करीत स्टेशनर्स व बुकसेलर्स, प्रकाशक झाला. आणि शेवटी शाळेत शिपाई म्हणून चिकटला. वरिष्ठांशी नमून लाचारीने वागायचे आणि खालच्यांना गोड लाथा मारायचे कौशल्य असणारा आहे. राजाकरण, समाजकारण, वाङ्:मय, शिक्षण, प्रकाशन सर्वच बाबतीत स्वत:ची म्हणून मते असणारा त्याच बरोबर रस्तीखेच आणि सुवर्ण मध्य याचे भान असणारा आहे. विद्यार्थ्यां बरोबर मिसळून वागणारा, धोरणी, कारस्थानी आणि नाटकी असला तरी दुष्ट नाही. त्याच्या काकदृष्टीवरूनच विद्यार्थी त्याला का हेडसर म्हणता म्हणता कावळे हेडसर म्हणू लागले. अशा कावळे हेडसरांचे बोलणे, चालणे, वागणे, हसणे यातून त्यांच्या स्वभावाच्या विविध छटा उकलून दाखविताना "कावळे हेडसर" या स्वभाव चित्रात सामंतांनी संवादाचा योजकतेने वापर केला आहे.

साध्या वाटणाऱ्या घटनेतून ही माणसाचे आयुष्य पालटले पण त्याच्या मनाला त्याच्या जुन्या परिस्थितीच्या खोल दडलेल्या जाणिवांचा किती सासुरवास असतो याचे उदाहरण "तो ओशाळा" मधील गणपतच्या स्वभावचित्रावरून दिसते. गणपत सुरुवातीला शाळेतील शिपाई असतो. नंतर पोर्टट्रस्ट मध्ये कामाला लागतो. त्याची आर्थिक परिस्थिती सुधारते. त्याच्या अंगावरचे मळकट कपडे जाऊन नवे कपडे आले. आपल्या लग्नाची पत्रिका घेऊन तो शिक्षकांकडे जाते, तेव्हा शिक्षक त्याला आपल्या जवळ बसण्याचा आग्रह करतात. मात्र आपण ज्या शाळेत शिपाई म्हणून काम केले. त्या शाळेतील शिक्षकांच्या बरोबरीने बसणे त्याला अधिक्षेपाचे वाटते म्हणून तो बाजूला उभा राहतो. ओशाळलेल्या विद्यार्थ्यांच्या मनातील संकोचाचे करुण चित्र यात आहे.

उत्तर हिंदुस्थानातुन येऊन मुंबई अत्तराचे विक्री दुकान थाटलेले. त्याबद्दची जाहिरात मासिकात दिली होती. त्या मासिकाचे संपादक जाहिरातीचे पैसे मागण्यासाठी उस्तादजीकडे जातात. परंतु त्यांच्याकडे संपूर्ण बिलाचे पैसे नसतात. गल्ल्यात शिल्लक असलेली रक्कम उस्तादजी दर आठवडयाच्या वायद्याप्रमाणे संपादकाच्या हाती देत असत, शेवटच्या गुरुवारी जेव्हा संपादक उस्तादजीकडे पैसे मागण्यासाठी जातात तेंव्हा उस्तादजी पुढच्या गुरुवारी तुमचे सर्व पैसे देतो कारण त्या दिवशी आम्ही आमच्या मुलुखाकडे जाणार आहोत म्हणून सांगतात. संपादक प्रत्येक वेळी पैसे मागावयास गेल्यानंतर सरबत देऊन आदरातिथ्य करण्यात कधी ही खंड पडला नाही. त्या आदरातीच्या या आणि उस्तादजींच्या मन मोकळ्या वागण्याचा संपादकांच्या मनावर प्रभाव पडतो. त्यांना आनंद वाटतो आणि उस्तादजींना साडेपाच रुपये तुम्ही तुमच्या गावी जात आहात म्हणून सोडून देत आहे म्हटल्यानंतर उस्तादजी म्हणतात," मी माझ्या प्रांतात गेल्यानंतर आपले आणि आपल्या या दानतीचे स्मरण ठेवीन " या मध्ये पर प्रांतीय माणसाचे व्यवहार चातुर्य, धंद्यातील निष्ठा, माणसे जोडण्याची कला ही वैशिष्ठये डोळ्यासमोरे उभी राहतात. चालू व्यवहारातील स्वार्थी जीवन जगणा-या समाजात असे प्रांजळ आणि प्रामाणिक व्यक्तिमत्व आढळते हे "उस्तादजी" या चित्राचे विशेष आहे.

पंचेचाळीशी गाठलेल्या आबासाहेबांची आणि पंचविशीच्या आंत

बाहेर असणा-या वाश्याची जिगर दोस्ती, "स्नेहाचे साम्राज्य काही और असते" यावर प्रगाढ विश्वास असणारा आणि पाळण्यातील बाळापासून ते मान हलणा-या म्हाता-या पर्यंत सा-यांशी सूत जुळणारा वाश्या तोंडाने फटकळ ही आहे. अशा वाश्याला आपला जावई करण्याची आबासाहेबांची इच्छा असते. कारण सहा सात मुलांचा खटाल्याचा संसार असणारे आबासाहेब आपल्या लग्नाच्या मुलीसाठी पाच-सहा वर्षांपासून स्थळ शोधताहेत. मात्र कोठेच काही जुळून येण्याचा योग न आल्याने ते हताश झालेत. आपल्या बायकोच्या सांगण्यावरूनच ते एके दिवशी वाश्याला चहापाण्यासाठी म्हणून आपल्या घरी बोलवतात या निमित्ताने वाश्याला आपली मुलगी दाखविता येईल असा आबासाहेबांचा विचार असतो. पण त्यांच्या कोणत्याच उद्देशाची पूर्व कल्पना वाश्याला नसते. या प्रसंगी आबासाहेबांची चाललेली लगबग पाहून नेहमीच फटकळपणे बोलण्याची सवय असलेला वाश्या अभावितपणे आबासाहेबांना "मुलीचे लग्न ठरल्यासारखे इतकी का धावपळ करता आहात?" असे बोलून जातो. आणि न कळत चालून आलेली वधू परीक्षेची संधी वाश्या आपल्या प्रेमळ पण फटकळ बोलण्याने गमावून बसतो. आबासाहेब त्याला हाकलून घराबाहेर काढतात. या व्यक्तिचित्रातून कोणतेही पाचपेच न कळणा-या बेधडक वाश्याचे स्वाभावचित्रण केले आहे.

तरुण सहकारी मित्रांच्या सहवासात भय्या काकांनी जपलेली आपली उत्साही वृत्ती आणि टवटवीत मनानेजगाकडे पाहण्याची त्यांची

मिस्कीलता छोट्या-छोट्या प्रसंगातून दिसते. वृध्दत्वाच्या अधिकाराने एखाद्या अनोळखी घरात शिरून तेथील तातुरवाशीणीकडून नातसूनेच्या नात्याने आदरातीथ्य स्वीकारणे. अनोळखी वाटसरूशी ओळख असल्याचा दावा सांगून न झालेल्या जुन्या भेटीची उजळणी करणारे बेरकी खोडकर तरीही निष्कपट मनाच्या भय्याकाकांची जीवन दृष्टी "तरणा म्हातारा" मधून कळून येते.

दैन्य, दारिद्र्याचे जीवन व्यतीत करणारे विनायक मास्तर निष्ठेने आणि श्रध्देने शिक्षकी पेशा करणारे शिक्षक. घरातील द्रारिद्र्यामुळे हतबल होतात. घरातील बाळंतपण आल्यामुळे व इतर अडचणीमुळे आपल्या जवळच्या तात्यांकडे हात उसने पैसे मागण्यासाठी जातात. तात्यांना पंचवीस रुपये देण्याची विनंती करतात. परंतु ज्या विनायक मास्तरांनी नकलून दिलेल्या लेखामुळे तात्यांना फायदा झाला होता. त्याचे तीस चाळीस रुपये होत असताना मास्तर फक्त पंचवीस रुपये मागतात हे गरीबीचे सौजन्य की दैन्य ? असा प्रश्न लेखकाला पडला.

सेवा निवृत्ती नंतरचा काळ खेड्यात घालविणा-या आण्णा वैद्यांनी पत्नीच्या आजारपणात केलेली सेवा-सुश्रूषा. पत्नीच्या निधनानंतर वाट्याला आलेल्या विधुरावस्थेत ही काटेकोरपणे सांभाळलेली स्वत:ची दिनश्चर्या आणि रोजच्या जीवनात त्यांनी घेतलेला आनंदाचा शोध यातून जाणवणारे आण्णा वैद्यांचे चित्र "स्थितप्रज्ञ" या शीर्षकाची सार्थकता पटवते.

माणसेवाईक प्राणी या संग्रहातील व्यक्तिचित्रांतून सामंतांनी मानवी मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते. व्यक्तिचित्रांचे बाह्यांग ते सूक्ष्मपणे चित्रित करताना दिसतात. उदा. "दैन्य" या स्वभावचित्राचा प्रारंभ करताना ते लिहितात. "घ्या ना चहा ! निवेल मग ..." आल्यापासून विनायक मास्तर अंग चोरून गप्प गप्पच खुर्चीवर बसलेले पाहून तात्या हळुवार शब्दात त्यांना म्हणाले.

विनायक मास्तरांचे धोतर मळलेलं - विरलेलं - दोन तीन ठिकाणी कप्प्या लावून शिवलेलं, कोट अंगाला आखुडलेला, सद-याच्या गुंडया वरखाली झालेल्या नि रंग गेलेल्या टोपीला सत्राशे साठ पोचे आलेले.

कानाजवळ हळूच लोंबून त्यांच्याशी गुजगोष्टी करणारं टोपीच्या आतलं चामडं किंचित ओशाळल्या मनानं आत टकलून, त्यांनी आपल्या काळयाभोर मिशयांतून आपली स्वच्छ दंतपंक्ती क्षणभर दाखवली न दाखवलीसं केलं. नि कप हाती घेत हळूच अस्पष्टसे पुटपुटले "हो घेतो की"

चहा पिता पिता मास्तर सभोवती गोंधळलेल्या नजरेनं चुळबळत कसलासा विचार करीत होते. शेवटी रिकामा कप खुर्चीखाली ठेवला, पुन्हा पुर्वी सारखेच ते खुर्चीवर अंग चोरून बसले. नि आपले हात कोपरांत दुमडून त्यांनी ते छातीशी घट्टी करून ठेवले".

"न्यायदेवता" मधील न्यायाधीशांचे व त्यांच्या खोलीचे वर्णन ही

असे चित्रमय आहे. "आतल्या खोलीत रंग उडालेल्या वाटोळ्या शिसवी टेबलाजवळ समोरासमोर दोनच जुनाट खुर्च्या होत्या त्यापैकीच एकीवर "साहेब" बसले होते.

गुडघ्याखालपर्यंत जेमतेम पोचणारं धोतरं. लहानमोठ्या व्यासांची अनेक वर्तुळं असणारा [पूर्वी पांढरा असलेला, अपण आता काळसर रंगाकडे झुकणारा] गंजीफ्रॉक, धोब्याकडे द्यायला झालेलं. पीळ पडलेलं दोरखंडवजा लोंबणारं जानवं गळ्यात, सोनेरी काळसर कड्यांचा कपाळावर चढलेला चष्मा, किलकिले डोळे, गुळगुळीत काळसर चेहरा नि तुळतुळीत टाळू...

समोरच्या वाटोळ्या टेबलावर कागदांचा पुष्कळ ढीग पडला होता, नि त्या ढिगाजवळ एक जुनं टाइमपीस उभं राहून टकटकत होतं "

व्यक्तीच्या मनातील भाव-भावनांना सभोवतालच्या वातावरणाची जोड देण्यात सामंतांचे कौशल्य दिसून येते. आपल्या वडीलांचे स्नेही असणारे न्यायाधीश आपणाला नोकरी मिळवून देतील या आशेने त्यांना भेटण्यासाठी आलेला मुलगा न्यायाधीशांकडून बोलावणे येण्याची वाट पाहतो त्या प्रसंगातील वातावरण सूचकतेने मांडले आहे. ते असे -

" भिंती ओक्याओक्याच होत्या। फक्त दोन तीन ठिकाणी [फ्रेम केलेल्या पण हळूहळू एकटे पडू लागलेल्या] ऐतिहासिक डिग्-यांनी [तारखा गेलेली] दोन तीन जुनी कॅलेंडरं भिंतीवर दिसत होती. त्याच्या जन्मापूर्वी विकत घेतलं असावं असं दिसणारं ... एक काळवंडलेल्या

तबकडीचं घड्याळ, आपल्या पडलेल्या भिंतीवर लटकलेलं दिसतं होतं। त्यातला बुरसलेला हिरवा-काळा पितळी हलता लोलक, "आला क्षण - गेला क्षण " म्हणत, निघून चाललेला काळ मोजत होता। आणि त्यावरूनच पुन्हा भानावर येऊन, त्याला जाणीव झाली "बराच वेळ झाला की आपल्याला -"

शब्दांनी जे प्रकट करता येत नाही ते रेषा टिंबानी निर्देशित करण्याकडे सामंतांचा कल दिसतो. परिणामी काही "व्यक्तिचित्रणात रेषांना व टिंबाना फार मोठे महत्त्व असते " -[६]

त्याकाळी शब्दचित्रे किंवा स्वभावचित्रे यांचे आकार आणि स्वरूप पुसट होते. म्हणून रघुवीर सामंतांनी त्या संबंधी आपली मते "मासलेवाईक प्राणी दुसरे सात" या पुस्तकात स्पष्ट केलेली आहेत. ते म्हणतात - "मूर्त स्वरूपात असलेल्या सृष्टीचा अनुभव आपण आपल्या इंद्रियांच्या साहयाने घेतो. त्याच प्रकारचा किंबहुना त्याहून ही जोरदार अनुभव मनाला देऊ शकणारी व त्या सृष्टीची मनात हुबेहूब प्रतिकृती निर्माण करून शकणारी कुशल कलापूर्ण शब्दयोजना म्हणजे "शब्दचित्र" पण कल्पना, भावना, मानवी स्वभाव, मानवी गुणदोष, व्यक्तींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, मनात चटकन भरतील अशा त्याच्या वैशिष्टयपूर्ण लकबी, परिस्थितीतील विशिष्ट घटना नि प्रसंग ... या सर्व केवळ मनाने आकलन करण्यासारख्या गोष्टी जेंव्हा असल्या कलापूर्ण शब्दचित्रणाने आपल्या समोर मूर्त स्वरूपात येतात. तेव्हा असल्या कलाकृतीला "व्यक्तीचित्र" म्हणता येते [७]

हे वर्णन शब्दचित्रांच्या व स्वभावचित्रांच्या दृष्टीने अत्यंत मार्मिक असून त्यात कोठे ही ढोबळपणा नाही. व्यक्तीचे बाह्यांग आणि अंतरंग छोट्या छोट्या शब्दाच्या फटका-याने चित्रित झाले पाहिजे असे त्यांच्या वर्णनावरून दिसते. तथापी दुबळ्या मनाचा, माणुसकीने मुसमुसलेला, न्यूनगंडाने पछाडलेला अशी शब्दयोजना करून व्यक्तीचे शब्दचित्र उभा करता येत नाही किंवा केवळ ढोबळ शब्द समूहाने बाह्यांग चित्रित करण्या बरोबरच त्याच्या अंतरंगातील चित्रणाला, शब्दांचा मालमसाला आणि मांडणीला अधिक महत्व असते.

सामंतांनी ही जी व्यक्तिचित्रे उभा केली आहेत ती करताना विशिष्ट गुण - दोषांच्या आविष्कारासाठी काही निवडक घटना, त्याच्या त्या वेळच्या हालचाली, अविर्भाव, उद्गार आणि त्याचे वागणे यांच्या आकलनाची, निवडीची आणी मांडणीची व्यक्तिचित्रण कलेत फार महती असते. व्यक्तीचे व्यक्तीत्व समजावून घेत असताना माणूस वेगवेगळ्या प्रसंगी कशा त-हेने वागतो यावरून त्याचे व्यक्तीत्व समजून येते किंवा एखादा प्रसंग, वातावरण घडताना त्या प्रसंगा भोवती आपली सजीव आणि निर्जिव सृष्टी आणि त्याकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन यावरच व्यक्तिचित्रांचे प्रतिबिंब अवलंबून असते. हा गबाळ्या, हा मुर्ख, हा चाणाक्ष, हा खोडकर, तो प्रेमळ, तो दुर्दैवी अशा शब्द समुहानी निकाल देणे म्हणजे शब्दचित्र नव्हे तर ती व्यक्ती किंवा तो प्रसंग पार्श्वभूमीसह त्याच्या जगण्याच्या वैशिष्ठ्यासह शब्दरूपाने हुबेहूब दाखविणे म्हणजे "शब्दचित्र" हे काम शब्दचित्रकार करीत असतो.

शब्दचित्रकार आपल्या भेदक आणि सूक्ष्म नजरेने व्यक्ती आणि प्रसंग शोधून काढतो. त्याची अचूक निवड करून सुरुवाती पासून अखेर पर्यंत सूचकता आणि अचूकता, तटस्थता कायम ठेवून या माल मसाल्याची सुयोग्य मांडणी करतो. असा लेखकच उत्तम शब्दचित्र निर्माण करू शकेल. अशा माल मसाल्यांनी युक्त असलेली अनुभूती, त्याला मार्मिक शिर्षक देऊन आकर्षक सूचक औत्सुक्यवर्धक व अर्थपूर्ण करून व्यक्ति चित्रकार सार्थ शीर्षक स्थाने ते चित्र पूर्ण करतो. वरील सर्व लेखन वैशिष्ठ्ये सामंतांनी आपल्या शब्दचित्रांत दाखविल्याचे दिसते.

रघुवीर सामंत हे हरहुन्नरी व प्रयोगशील लेखक होते. लघुनिबंध, लघुकथा, कोश वाङ्:मय, बालगीते, रूपांतरीत वाङ्:मय या सगळ्या लेखनांचा प्रपंच त्यांनी केला होता. प्रयोगशील दृष्टी असल्यामुळे काही तरी वेगळे लिहावे, वेगळी अनुभूती व्यक्त करावी या उद्देशाने हा लेखन प्रपंच त्यांनी केलेला आहे. शब्दचित्रे आणि स्वभावचित्रे रेखाटत असताना त्यांनी "चित्रबंध" नावाचा भावना आविष्कारण करणारा एक प्रयत्न केलेला आहे.

"तारांगण" या संग्रहात "दात आणि मोती", "कल्पनांच्या आट्यापाट्या", "परिस्थितीचे बळी","टळलेला अपघात", "ढालीच्या दोन बाजू", "पैशाचं सोंग", "गुज्जण", "माणसातला मी", "ओळखीचा अनोळखी", "एक गोड अर्ज","ब्रम्हघोटाळा", "गरीबीचे सौजन्य", "न्यायदेवतेचे घडयाळ" " एक जुनाट शिलालेख", "खोट्याचा सासुरवास", बोळक्याची लाज", "भटो भटो", "सोदे आणि मंडळी", "हरवलेल्या वस्तु", "भवानी आमची परक्षा", "अहंकारी भूतदया" ही शब्दचित्रे समाविष्ट आहेत.

सामंतांनी आपल्या मनातील हे भावतरंग, स्वैरचिंतन अनेक ठिकाणी व्यक्त केलेले आहे. उदा.

सामंतांचे शेजारी असणारे वयोवृध्द सुखवस्तु गृहस्थ आपल्या दारा समोरून बाजारासाठी येणा-या जाणा-या खेडूत बाजार क-यांना आपल्या वृध्दत्वाच्या अधिकाराने आवश्यक, अनावश्यक चौकशी करून बेजार करावयाचे हा त्यांना परिपाठच होता. परंतु एकदा वारली जातीची तरूणी बाजारकडे जाताना त्यांनी "काय ग ए थांब ... उतर टोपली खाली " म्हणून आपल्या नेहमीच्या उलट तपासणीला प्रारंभ केला. तीला "तुझा नवरा कोण गं ?" असे विचारल्यानंतर ती रागाने फणफणारी तरूणी त्या वृध्दाला म्हणजे "थेरडया .. मेल्या तुला रे कशाला पायजे ? बोलण्याची लाज धर ! " या अनपेक्षित उत्तराने खजिल होऊन म्हातारा तीच्याकडे पहात राहतो. [बोलण्याची लाज].

ज्या आपल्या मित्राला निवेदक "पिकलं पान गळालं" म्हणून वडीलांच्या निधनाचे दुःख विसरण्याचा सल्ला देतो. तोच मित्र दुःखाच कारण बिनदिक्कतपणे सांगताना म्हणतो की, आमचे वडील ओसरीवर खोकत पडून रहायचे तरी ही त्यांचा मला खूप मोठा आधार होता. फक्त त्यांच्या खोकण्याच्या आधारावरच मी दारात उधारी मागायला येणारा वाणी, आणि दूधवाला दम भरून परत पाठवित होतो. कारण - वडीलांना पेन्शन मिळत होती ! आता वडील वारले. यापुढे किराणा, दूध आणि घरभाडे अशा तिहेरी खर्चाचा बोजा आपल्या पगारावर पडणार याचे दुःख आहे. हे ऐकून कोणत्याही दुःखाला दोन बाजू असतात याचे चित्रण "टालीच्या दोन बाजू" या चित्रबंधात

केले आहे.

गोरक्षणाच्या कार्याला हातभार म्हणून आठवड्यातील दोन दिवस गो-रक्षकांच्या जथ्यात खांद्यावर झोळी लावून फिरणा-या गो सेवकांच्या मेळ्यात सामंतांच्या घरच्या नात्यातील ही मंडळी सहभागी असतात. त्या जथ्यातील काही "वस्ताद" कार्यकर्त्यांनी लहानग्या सामंतांना "घरी मांसाहार निषिद्ध आहे. का ? या विषयीची कळत न कळत विचारणा केल्यानंतर "आमच्या घरी मांसाहार करतात" हे सरळ सरळ सांगणा-या सामंतांची चुगली दुस-या भावंडांनी घरी सांगितल्यानंतर घरात कसा हलकल्लोळ माजतो. याचे खेळकर शैलीतील वर्णन " खोट्याचा सासुरवास" या चित्रबंधात आढळते. "खोटं कधी बोलू नये " या संस्कारात वाढलेल्या सामंतांनी आपल्या बालपणीची ही घटना येथे रेखाटली आहे.

पावसात भिजल्या रस्त्यावरून चालताना पाय घसरून पडलेल्या वामनरावांकडे पाहून तोंड लपवून हसणा-या थोरामोठ्या माणसांपेक्षा, वामनरावांकडे पाहून निष्कपट, निर्व्याजपणे हसणारा पाटीवाला मुलगा सामंतांना वेगळा वाटतो. हसण्याची भावना आणि त-हा चित्रित करताना हास्याचा खरा आनंद आणि अर्थपूर्ण हसणे याचा मागोवा "दात आणि मोती" या चित्रबंधात घेतला आहे.

अनपेक्षित रित्या रेल्वे प्रवासात निवेदकाची जुन्या मित्राशी भेट होते. भेटलेला मित्र निवेदकाला नावानिशी पुकारतो. आपल्या शालेय

जीवनातील आठवणी सांगतो. स्वतःच्या व्यवसाया विषयी बोलतानाच, बाजारात आलेल्या निवेदकाच्या नव्या पुस्तका विषय ही बोलतो. घरी येण्याविषयी आग्रह करतो. मात्र निवेदकाला आपल्या मित्राचे नांव ही आठवत नाही. फक्त चेहरा ओळखीचा वाटतो. अखेर आपला पत्ता देण्यासाठी म्हणून निवेदक जेव्हा आपल्या मित्राची डायरी घेतो. त्या क्षणी त्याला ख-या अर्थाने जुन्या मित्राची ओळख पटते. नाशिक आणि मुंबई येथील वास्तव्याच्या त्याच्या स्मृती जाग्या होतात. ब-याच वर्षांनंतर भेटलेल्या या मित्रात परस्परांना पुन्हा भेटण्याविषयीचा वायदा होतो. तेव्हा निवेदक म्हणतो [ वायद्याला कांही एक किंमत नसते ! ... किंमत असते ती त्या प्रत्यक्ष क्षणीच्या दोघांच्या सोज्वळ भाव भावनांना ... त्या वेळच्या सहजासहजी मिळणा-या क्षणिक सुखाला ! ओळखीचा वाटणारा अनोळखी, भावना न दुखावतां अगदी पुर्वी इतकाच ओळखीचा करणं ही कला मोठी सुखद असते !

[ ओळखीचा अनोळखी ]

व्यवहारातील गफलतीमुळे इराण्याने पाच रुपयाच्या नोटेला दहा रुपयाची नोट समजून परत दिलेल्या नऊ रुपये साडे पाच आण्या मधील पाच रुपये इराण्याला परत करण्याचा निवेदकाचा सल्ला धुडकावणारा मित्र म्हणतो - इराण्याकडून आलेल्या नाण्यांतला एखादा रुपया खोटा आला असता आणि मी त्याला प्रामाणिकपणे परत द्यायला गेलो असतो तर त्याने कानावर हात ठेवले असते. आणि आता जादा आलेले जादा पाच रुपये त्याला प्रामाणिकपणे परत केले तर तो फक्त थँक्यू म्हणेल.

प्रत्यक्ष लाभापुढे तकलादू प्रामाणिकपणा दाखविण्याची इच्छा नसणारा असा मित्र आणि "सौदे आणि मंडळी" त भेटतो.

जादूच्या प्रयोगासाठी गावात आठ दिवसाचा मुक्काम टाकलेले जादूगार प्रो. भुरटे मामलेदारांनी प्रयोगासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल आठ दिवसांचा मोफत दोन पास मामलेदार साहेबांना देतात. आणि या मोफत पासचा फायदा घेऊन मामलेदार साहेबांचा चिरंजीव राजा प्रो. भुरट्यांच्या जादूच्या प्रयोगाचा छडा लावण्यात यशस्वी होतो. आणि प्रो. भुरट्यांच्या जादूच्या प्रयोगाचे रहस्य उघड होते याचे खेळकर वर्णन "माणसातला मी " मधून आले आहे.

मान्यवर व्यक्तींच्या वा बडया अंमलदारांच्या स्वागता प्रित्यर्थ लहान मुलांकरवी म्हणून घेतली जाणारी स्वागत गीते हा आदरातिथ्यातील एक औपचारिक भाग पण अजाणतेपणी लहान मुलांकडून होणारा शब्दोच्चारातील फरक कसा मजेशीर गोंधळ उडवून देतो याचे मिस्कील वर्णन " गुज्जण" या चित्रबंधात केले आहे.

रेल्वे तिकिटासाठी स्टेशन मास्तराकडे खोटी नाणी दिल्याचा आरोप आलेले वृध्द पेन्शनर हेरंबराव आणि खोट्या आरोपामुळे चौकशीला सामोरे जाताना त्यांच्या स्वाभिमानी मनाची झालेली तगमग [परिस्थितीचे बळी], लेखन करीत असतानाच्या प्रसंगी छोट्या बहिणीने येवून पुस्तक मलाच अर्पण कर म्हणून हट्ट धरल्यानंतर लेखकाच्या मनात

उमटलेल्या हळुवार भावना-भावनांचे चित्रण [एक गोड अर्ज], रेल्वे मधून आपल्या बाळासह प्रवास करताना रेल्वेला अपघात झाला तर त्या बाळाचे काय होईल ? रेल्वेतील उघडया खिडकी जवळ उभ्या असलेल्या त्या माणसाचा भार दारावर पडला आहे. पण दाराची कडी लागलेली नाही. जर दार उघडले तर त्याचे काम होईल ? याची भिती ... ही भीतीची लकेर लेखकाच्या मनात असतानाच निवेदक त्या दाराची कडी लावतो तेव्हा धोक्याचा प्रसंग टळल्याचे समाधान होते [ टळलेला अपघात] खिशात पैसे नसून ही दुकानदाराशी घासाघीस करणाऱ्या मुलाला भिती वाटते. की वस्तु खरेदी केल्यानंतर त्या वस्तुचे पैसे आपणाजवळ नाहीत हे "पैशाचे सोंग" या कथेत सामंतांनी मार्मिकपणे सांगितले आहे. हे हलके – फुलके विषय जरी वाटले तरी त्यात सामंतांनी आत्म चिंतन जे केले आहे ते अत्यंत मार्मिक झालेले आहे.

ललित गद्याकडे झुकणारा काहीसा स्वैर भावनांचा आविष्कार करणारा असा "चित्रबंध" हा वाड्:मय प्रकार सामंतांच्या प्रयोगशीलेतून पुढे निर्माण झाला. या चित्रबंधाची रचना लघुनिबंध शब्दचित्र यांच्या मिश्रणातून झालेली दिसते. "चित्रबंध" या लेखनाविषयी स्वत: रघुवीर सामंतांनीच "तारांगण" या पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या "तारांगणाकडे दृष्टीक्षेप" या निवेदनात आपली भूमिका मांडली आहे. ते म्हणतात. "एखादी घटना चित्रात्मक पध्दतीने रंगविताना आपली तदनुषंगाने येणारी मते, आवडी निवडी मनात डोकावतात व ती ही कलाकृतीत

प्रतिबिंबित करावीत, असे वाटते. ही खेळकर लघुनिबंधाच्या भाराची वैयक्तिक "मतप्रचारी" झाक त्यात कित्येक वेळा सूचक तर कित्येक वेळा स्पष्ट प्रतिबिंबित होते, आणि यामुळेच ते लिखाण " शब्दचित्र" किंवा "लघुनिबंध" या दोन्ही जातीत निर्भीडपणे टाकावेसे वाटत नाही. म्हणून मला त्याला "चित्रबंध" हे सहज सुचलेले नांव द्यावेसे वाटले. [८]

वरील त्यांच्या मनोगतावरून असे वाटते की - एखादी श्रीमंत घटना घेवून त्यात सूचकता, कलात्मकता यांची पार्श्वभूमी देऊन ती घटना रंगविता येते. आणि त्यामुळेच हे मिश्रण पध्दतीचे चित्रबध्द लेखन रघुवीर सामंतांनी केल्याचे दिसते. "तारांगण"मधील आपल्या निवेदनात चित्रबंधा विषयी अधिक विवेचन देताना ते म्हणतात " लेखकाला आपल्या मनाचा सूक्ष्म कप्पा एखाद्या चित्रात बांधून सूचक पध्दतीने वाचकासमोर मांडावयाचा असेल तर तेथे शब्दचित्रापेक्षा किंवा लघुनिबंधापेक्षा"चित्रबंधा" चाच आश्रय करावा लागेल असे मला प्रांजळपणे वाटते. [९]

यावरून चित्रबंध हा लेखन प्रकार थोडयाशा वेगळ्या स्वरूपात अवतीर्ण होतो असे दिसते. कारण चित्रबंध या लेखनात, शब्दचित्रात आणि लघुनिबंधात वर्णन करता येणार नाहीत अशा मनातील सुप्त भावनांचा किंवा आवडी - निवडीच्या भावनात्मक प्रतिक्रिया व्यक्त होतील असा हा वाङ्:मय प्रकार आहे. जीवन जगत असताना लेखकाला भोवताली घडणाऱ्या घटना संदर्भात काहीतरी स्वैर चिंतन करता येईल. आत्म्यात दडलेल्या काही भावनांचा आविष्कार करता येईल. लघुकथा किंवा

स्वभावचित्रे यांच्या पेक्षा विशिष्ट भावनेची तीव्रता अधिक रेखीवपणे मांडता येईल असे हे चित्रबंधाचे लेखन आहे.

"गुज्जण", "ब्रम्हघोटाळा", "माणसातला मी " इत्यादी सर्व तात्कालीक प्रसंग, घटना घेऊन सामंतांनी खेळकर आणि विनोदी पध्दतीने सांगितले आहे. घटना प्रसंगातील क्षुल्लक वाटणा-या परंतु गांभीर्य धारण करणा-या अशा घटना प्रसंगातील क्षण तेवढयाच मार्मिकतेने, सूचकतेने सांगितल्यामुळे रघुवीर सामंतांचा हा "चित्रबंध" वाड्:मय प्रकार त्यांना सहज सुचला असला तरी नेमकेपणाच्या वर्णनाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा वाटतो. कारण चित्रबंधाच्या रचनेत लघुकथा किंवा लघुनिबंधा सारख्या वर्णनाचा व्याप न करता नेमकेपणा तेवढयाच गतीमानतेने सांगणे हे या प्रकाराचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

रघुवीर सामंतांचा वरील वाड्:मय प्रवास पहात असताना त्यांनी कादंबरी, लघुकथा, लघुनिबंध, कोश वाड्:मय, बालगीते, मासिकाचे संपादन, काही अनुवाद व शब्दचित्रे, स्वभावचित्रे आणि चित्रबंध असे हे लेखन प्रपंच सूक्ष्मपणे वाचल्यानंतर त्यांनी लिहिलेली शब्दचित्रे अधिक उठावदार दिसतात. त्यांनी "उपकारी माणसे"," भेटेन पुन्हा", आम्हाला जगायचंयं", "या कादंब-या, "वाळूतील पाऊले,""तांडा," "रज:कण" हे कथा संग्रह तर "आदर्श कृषीवत्स" हे चरित्र लिहिले. कथा वर्णनात ते फारसे रमलेले दिसत नाहीत. कादंब-यातील ग्रामजीवन, शेतक-यांचे जीवन ढोबळ मानाने चित्रित केले. मात्र बालगीते लिहिताना

ते बालप्रवृत्तीशी एकरूप झालेले दिसतात लघुनिबंधांचे चित्रण धावते झालेले आहे.

अशा विविध लेखनात संचार करणारी त्यांची लेखणी मात्र शब्दचित्रात अधिक तन्मयतेने वटवटताना दिसते. "हृदय", "मातृलेवाईक प्राणी ", "तारांगण" आदी संग्रहातील वर उल्लेख केलेल्या पन्नास एक शब्दचित्रांचे वाचन केल्यानंतर त्यांच्या शब्दचित्रांचा आशय आणि विषय नाविन्यपूर्ण तर आहेच परंतु सामंतांची दृष्टी उच्चवर्णीय पासून तळागाळातील कष्टक-यापर्यंत पोहोचली होती हे ही दिसून येते.

रघुवीर सामंत माणसांच्या भावनांचे प्रकटीकरण करतातच, पण प्राण्यांच्या ही मनातील भावनांचे दिग्दर्शन करतात. अशा विविध व्यक्तिचित्रांच्या मनातील भावना राग,लोभ, दैन्य,कारुण्य,आनंद, दु:ख, अशा विविधतेने व्यक्त केलेल्या आहेत.

व्यक्तिचित्रे रंगविण्याची सामंतांची एक लकब आहे. शीर्षक मार्मिक, प्रसंग आकर्षक, वर्णन चित्रबध्द आणि शेवट परिणामकारक अशा लेखन वैशिष्ठयांनी ही व्यक्तिचित्रे भारावलेली आहेत. ही व्यक्तिचित्रे किंवा चित्रबंध वाचल्यानंतर मनात भावनांचा,कल्पनांचा काहूर उठतो. त्या व्यक्ती, प्रसंगाविषयी जिव्हाळा निर्माण होतो आणि प्राप्त परिस्थितीतील समाज जीवनाचे विदारक दृश्य ही जाणवून जाते.

आज विस्मृतीत गेलेल्या रघुवीर सामंतांच्या व्यक्तिचित्रांचे वाङ्‌मयीन महत्त्व मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात "या क्षेत्रात प्रथमोल्लेखाचा मान कुमार रघुवीरांचा."[१०] या शब्दात अधोरेखित केलेले आहे.

प्रकरण चौथे –

## * संदर्भ सूची *


१] रघुवीर सामंत बेरीज आणि वजाबाकी मॅजेस्टिक प्रकाशन मुंबई पृष्ठ १२०

२] तत्रैव पृष्ठ १२१.

३] तत्रैव पृष्ठ १२१.

४] तत्रैव पृष्ठ १२१.

५] मराठी विश्वकोश खंड १२ पृष्ठ १२३९

६] मासलेवाईक प्राणी पाहिले सात अमरज्योती वाङ्मय प्रकाशन मुंबई पृष्ठ पृष्ठ २.

७] मासलेवाईक प्राणी दुसरे सात अमरज्योती वाङ्मय प्रकाशन मुंबई पृष्ठ ३.

८] तारांगण पारिजात प्रकाशन १०२.

९] तत्रैव पृष्ठ १०३.

१०] आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दोन व्हीनस प्रकाशन पृष्ठ ४९०.